
# आग लागो या सगळ्याला

## मुरलीधर जावडेकर



मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

मुरलीधर जावडेकर

# आग लागो या सगळ्याला

(दोन अंकी नाटक)

मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे

© सर्व हक्क
**मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे**
(क्र. ई. ५६४८ पुणे दिनांक २१.१.२०११)
यांच्या स्वाधीन

**ଔ**

लेखक
**डॉ. मुरलीधर जावडेकर**
उच्च उत्पन्न गट वसाहत,
इमारत क्र.१, गाळा क्र.९,
संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११०१८.
दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३
मोबाईल : ९८९०१६९१५६

**ଔ**

**प्रथमावृत्ती** : २०१२

**ଔ**

**मुखपृष्ठ**
लक्ष्मीकांत तोष्णीवाल
मोबाईल : ९४२२३०७४५३

**ଔ**

**अक्षरजुळणी**
व्यंकटेश टाईप
सौ. सुजाता तोष्णीवाल
मोबाईल : ९४२०४८०५३६

**ଔ**

**मुद्रक**
लकी प्रेस
४ सदाशिव पेठ, पुणे ३०

**ଔ**

**देणगी मूल्य ₹ ३०=००**

ई पुस्तक निर्मिती व वितरण :

# ई साहित्य प्रतिष्ठान

फ़ोन : 9869674820

esahity@gmail.com

पत्ता : जी ११०२, इटर्निटी

तीन हात नाका , ठाणे, ४००६०४

*www.esahity.com*

ई साहित्य प्रतिष्ठान ही नोंदणीकृत संस्था असून अनेक लेखक वाचकांनी एकत्र येऊन सुरू केली. संस्थेतर्फ़े दर आठवड्याला एक मराठी ई पुस्तक चाळीस देशांतील सुमारे दोन लाख वाचकांना विनामूल्य वितरित केले जाते. त्याशिवाय ई साहित्यच्या विविध वेबसाईट्सना लाखो लोक व्हिजिट करतात.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

कवी गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी)
यांस

**पशूस करिशिल मानव! मानव नेशिल देवपदा!**

**देवपणा स्थिर देवांचाही राखिसि तूचि सदा!**

असे आपण मानवी प्रीतीचे (म्हणजेच स्त्री-पुरुष संबंधाचे) महत्त्व सांगितलेत. 'भक्तीच्याही उत्कर्षाची सीमा म्हणजे प्रीती' अशी प्रीतीची व्याख्या केलीत. काव्य आणि नाट्य यांतून दिव्य प्रीती श्राव्य आणि दृश्य रूपात उत्कटपणे जगापुढे सादर केलीत. याच कलाधर्माचा प्रसार केला तरच या नाटकात वर्णन केलेल्या घोर प्रकारासारखे प्रकार टळतील ना?

**– मुरलीधर जावडेकर**

# आग लागो या सगळ्याला

## अंक पहिला

(स्थळ : 'देशभक्त रामण्णा रानबोके कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय'. त्यासमोर रस्ता.)

**जीवन** : (येत) बाबा, आई, आता परत जा. आता माझं मी बघतो.

**बाबा** : (मजूर. येत) जीवनबाळा, आता तुझं तूच बघणार बाबा. आम्हाला काय कळतंय या मोठ्या गोष्टीतलं?

**आई** : (मजूर स्त्री. येत) पण बाळा, तुला या कॉलेजात प्रवेश मिळाल्याचं कळलं म्हणजे आम्ही जातोच.

**जीवन** : तुम्ही इथं थांबाल तर आज खाल काय? कामावर नाही का जायचं?

**आई** : तुझं यश पाहूनच आमची पोटं भरलीत.

**जीवन** : पण सगळ्या भावंडांचं काय?

**आई** : होय रे बाबा. म्हणूनच लवकर नाव घाल बाबा कॉलेजात.

**जीवन** : ते काय आपल्या हातात आहे? मी जाऊन बघून येतो (जातो.)

**बाबा** : पोरानं कमाल केली. नव्वद टक्के मार्क मिळवले. त्याला प्रवेश मिळणार नाही तर कुणाला मिळणार?

**आई** : शाळंत पहिला नंबर काढला. देवाची कृपा असं रत्न पोटी आलं.

**बाबा** : कोळशाच्या खाणीतलं माणिक म्हणतात तसं पोरगं निपजलं.

झोपडपट्टी म्हणजे कोळशाची खाणच नव्हं का?

(ध्वनिक्षेपकावरून घोषणा : इयत्ता अकरावीतील, कला शाखेसाठी इयत्ता दहावीत पन्नास टक्के, वाणिज्य शाखेसाठी सत्तर टक्के आणि विज्ञानशाखेसाठी नव्वद टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेशासाठी अर्ज करता येईल. विद्यार्थिसंख्या भरताच प्रवेश बंद करण्यात येईल. सर्वांनी आपापल्या शाखेच्या रांगेत उभे राहावे. रांग मोडणाऱ्याचे नाव कमी करण्यात येईल. प्रवेश मिळालेल्यांची यादी फलकावर पाहण्यास मिळेल.)

**बाबा** : ऐकलंस का? नव्वद टक्क्याला प्रवेश आहे! आपल्या जीवनला प्रवेश मिळणार!

**आई** : देवच पावला!

**बाबा** : अबबबबब! केवढं कॉलेज हे! आतून तर राहूच दे पण इतक्या जवळूनसुद्धा कधी मी बघितलं नव्हतं! करीत तरी काय असतील एवढाल्या इमारतीत?

**आई** : ती साहेबलोकांची कामं! आपल्याला काय ठावं असणार? आपली हाडं झोपडीतच पडायची.

**बाबा** : असं म्हणू नकोस हां. आपला जीवनपण आता बडा साहेब हेईल. बंगला उठवील. गाडी घेईल. सगळं काही करील. तो आलाच बघ. (जीवन येतो.) काय झालं रं बाळा? असा चेहरा का उतरला?

**जीवन** : कशाला शाळंत घातलंत मला? त्यापरीस तुमच्याबरोबर मजुरीला का नाही नेलंत? बडा साहेब होण्याचं हे वेड कशाला डोक्यात भरवलंत माझ्या?

**बाबा** : बाळा, तू हुषार म्हणून!

**जीवन** : इथं हुषारी पुरत नाही, बाबा. पैसे लागतात. माणसाचा जीव पिशवीत वाढतो. जिवाच्या वाढीबरोबर पैशाचीपण पिशवी का नाही वाढत?

**आई** : किती पैसं लागतील रं बाळा?

**जीवन** : आपली पुरी झोपडी विकली तरी पुरणार नाही.

**बाबा** : पण बाळा, तुला नव्वद टक्के मार्क मिळाले ना?

**जीवन** : ९७ टक्के मार्कांचा मुलगा पहिला आहे, बाबा. मला नव्वद मार्क आहेत. आणि नव्वद मार्क मिळवणारी इथं नव्वद मुलं

आहेत. त्यांना मार्क मिळण्याची गॅरंटी होती म्हणून त्यांनी कालच फॉर्म भरून ठेवलेत-दहा दहा हजार रुपये देणगी देऊन. आई, खरं तर मी झोपडपट्टीच्या नरकात राहून नव्वद मार्क मिळवलेत. या पोरांसारखा मी स्वर्गात राहत असतो तर सत्याण्णवच काय शंभर टक्केसुद्धा मार्क मिळवले असते.

**आई** : नशीब असतं, बाळा.

**जीवन** : नशीब नसतं. पैसे असतात. तुम्ही जा कामाला. नाहीतर मी आपल्या हायस्कूलमध्ये पहिला आलो म्हणून पेढे तर राहिलेच पण माती खावी लागेल. जा. मीही बघतो माझ्याजोगी काही लहानमोठी नोकरी कुठं मिळते का ते. रामराम या शिक्षणाला. रामराम बंगल्याला. रामराम गाडीला. रामराम पोटभर जेवणाला.

**आई** : रागवू नकोस, बाळा. आम्ही जातो कामाला. पण तू घरी आल्याबिगर आम्ही काही खाणार नाही हां! (जातात.)

**जीवन** : पैसे! पैसे!पैसे! बिनपैशानं जन्म का मिळतो? पैशाचं गाठुडं पाठीवर घेऊन जन्म का नाही मिळत? दुसऱ्या कुठल्याही कॉलेजात जायचं तर राहणार कुठं? मसणात? आणि खायला कोण घालणार? खवीस? आणि इथनं तिथं जायचं म्हटलं तर आपल्या ढुंगणाखाली मोटरसायकल थोडीच आहे? आणि पेट्रोलच्या टाकीत काय मुतायचं आहे? बसला म्हणे पास मिळतो. काय फुकटात मिळतो काय? एकेक मासाचा गोळा काढून देता आला असता आणि कुणी विकत घेतला असता तर बरं झालं असतं... नोकरी... नोकऱ्या काय मांडून ठेवल्यात खाटकाच्या दुकानापुढं कोकरं बांधून ठेवतात तशा? मागितलं की दिलं कापून ताजं ताजं?... आई, बाबा, जन्माला आलो तेव्हाच गाडून का नाही टाकलंत एखाद्या इमारतीच्या पायाच्या खड्ड्यात? तुम्हीच रोजरोज पाया खणता ना? मग पोर झालं की टाकून का नाही देत त्यात? वर सिमेंट का नाही थापून टाकत? आणि मग वास्तुदेवतेला बळी दिला म्हणून मालकाकडून पैसे का नाही मागत? या सगळ्या मोठमोठ्या उंचच उंच इमारती उभ्या राह्यल्या आहेत त्याखाली आमच्या

जीवनांचा बळीच दिलेला नाही काय?... मी आलो नाही तर म्हणे खाणार नाही. खोटं. जरा वेळ रडाल, ओरडाल. पण इतर पोरांसाठी खालच खाल... खा. खा. पण पोरांना शिकवू नका. शिकून मरण्यापेक्षा न शिकून जगणंच चांगलं. रेल्वेची वाढ होतीय ती आमच्यासारख्यांना क्षणात मरण्यासाठीच. चला. जीवनराजे, क्षणात खेळ खलास. कळणारसुद्धा नाही (जाऊ लागतो.)

**एक मुलगी** : (धावत येत) थांबा. थांबा. जाऊ नका. मला मदत करा.

**जीवन** : मदत?

**मुलगी** : होय. मला लपवा.

**जीवन** : कुठं?

**मुलगी** : कुठं नाही. फक्त स्वस्थ उभे रहा. तुमच्या आड मी उभी राहते. हलू नका.

**जीवन** : म्हणजे?

**मुलगी** : तिकडे एक गुंड आहे. तो तो पहा. दिसला का? त्याच्याजवळ कॅमेरा आहे. तो बघा. तो मुलींचे फोटो काढतो आणि त्यांना फसवतो. तो माझ्या मागे लागला आहे. त्याला माझे फोटो काढायचेत. तो फोटो काढतोय म्हटल्याबरोबर माझ्या मैत्रिणी पळून गेल्या. त्यांची नावं कॉलेजात घालून झाली होती. माझं राहिलं म्हणून मी मागे राहिले. मेल्यानं माझे फोटो काढलेत की काय कुणास ठाऊक! (रडू लागते.)

**जीवन** : रडू नका. मी आहे ना! शांत व्हा. हे सगळं या कॉलेजच्या आवारात चालतं? कॉलेजचे शिपाई काय मेलेत की काय सगळे?

**मुलगी** : शिपाईच काय, स्टाफ आणि प्राचार्यसुद्धा म्हणतील, 'कॉलेजचे फोटो काढले तर काय झालं?'

**जीवन** : का?

**मुलगी** : बड्या व्यापाऱ्याचा मुलगा आहे तो. कॉलेजला मोठी देणगी दिली आहे त्यांनी. राजकारणी लोकांनासुद्धा तेच पैसा पुरवतात.

**जीवन** : हे सगळं तुम्हाला कसं कळलं?

**मुलगी** : माझ्या वडिलांनी सांगितलं आणि सावध राहायला पण सांगितलं. पण घडू नये तेच घडलं. आता बाबा मला रागवणार. म्हणणार, 'एवढा इशारा देऊनही सगळं मुसळ केरात. कॉलेजच बंद केलं पाहिजे कारटीचं. मुली मवाल्यांच्या बटकी होण्यापेक्षा मुलींना बाहेरचं शिक्षणच बंद केलं पाहिजे.' रोज ते इतर मुलींच्या नावानं ओरडत होते. आज माझ्या नावानं ओरडणार. माझा फोटो त्या मवाल्यानं काढल्याचं त्यांना कळलं ना, तर कॉलेज बंद करतील माझं.

**जीवन** : तो पहा. तो इकडेच येतोय.

(तो श्रीमंत मुलगा मुलीचा फोटो काढण्यासाठी फिरतो. जीवन मध्ये. त्या दोघांचा उलटसुलट लपंडाव होतो. अचानक जीवन त्या मुलावर चाल करून जातो आणि त्याच्या हातातल्या कॅमेऱ्यावर झेप घालून तो उघडून आतली फिल्म उलगडून टाकतो.)

**जीवन** : (मुलीच्या हातात कॅमेरा देत) हा कॅमेरा आता तुझा आहे. सोडू नकोस. तुझ्या अंगावर हात टाकून तो घेण्याची याची हिंमत नाही.

**मुलगा** : मला विरोध करण्याची तुझी हिंमत? कोण तू? हट बाजूला. कॅमेरा माझा आहे. मुकाट्यानं परत द्या; नाही तर चोरलात म्हणून बेड्या ठोकीन. दे. आण. (असे म्हणून जीवनला ढकलून मुलीकडे जातो. 'वाचवा, वाचवा' असे ती ओरडते. जीवन त्या मुलाला मागून पकडतो. दोघांची मारामारी सुरू होते. 'अहो सर, अहो सर' असे मुलगी ओरडत राहते. हळूहळू गर्दी जमते. लोक त्यांना सोडवतात.)

**मुलगा** : माझा कॅमेरा द्या. मी चाललो.

**जीवन** : हा मुलींचे फोटो काढतो.

**मुलगा** : काय पुरावा आहे तुमच्याकडे? कॅमेरा रिकामाच आहे. या दोघांचंच चोरून प्रेमप्रकरण चाललं होतं. त्यांना भीती वाटली म्हणून यानं माझ्यावर हल्ला केला.

**गर्दीतील**
**एक जण** : हे बघा. चौकशी करायला आम्हांला वेळ नाही. बाई, कॅमेरा कुणाचा आहे? त्यांचा? मग देऊन टाका. आणि हे पाहा हं

फोटोग्राफर, तुम्ही विद्यार्थी दिसता. मग कॉलेजात काय वहीपुस्तकं आणता की कॅमेरा? पुनः कॉलेजात कॅमेरा आणायचा नाही. चला. गर्दी हटवा. कामाला लागा. (गर्दी जाते.)

**मुलगा** : (गेल्याचं नाटक करून परत येऊन) याद राखा. मला चॅलेंज करता काय? गाठ माझ्याशी आहे. दोघांनाही पाहून घेईन. (मुलीकडे पाहून, हातवारे करून) पुरीपुरी पाहून घेईन. (जातो.)

**जीवन** : कोण आहे हा सैतान?

**मुलगी** : रमण.

**जीवन** : कॉलेजातल्या शेवटल्या वर्षाला आहे काय?

**मुलगी** : (मोठ्याने हसून) छे! छे! दहावीत मुक्काम ठोकून बसला होता म्हणून मोठा दिसतो.

**जीवन** : तुम्हाला हे सगळं कसं माहिती?

**मुलगी** : अहो, आमच्याच शाळेत होता तो. सगळे प्रकार केले – खाजगी शिकवण्या लावल्या. परीक्षेत कॉप्या केल्या. पेपर तपासणारांना पैसे चारले. पण पास काही होईना. होणार कसा? उत्तर लिहून दिलं तरी आपल्या अक्षरांत उतरवता आलं पाहिजे ना! शेवटी मामाकडे म्हणून दूरच्या गावी जाऊन डमी बसवून पास झाला!

**जीवन** : आणि याला प्रवेश मिळाला?

**मुलगी** : चेअरमननं आपल्या अधिकारात दिला!

**जीवन** : मी जाऊन चेअरमनना विचारतो.

**मुलगी** : काय?

**जीवन** : मला प्रवेश का दिला नाही म्हणून?

**मुलगी** : म्हणजे? तुम्हाला प्रवेश नाही मिळाला?

**जीवन** : नाही मिळाला.

**मुलगी** : तुम्हाला मार्क किती आहेत?

**जीवन** : नव्वद टक्के.

**मुलगी** : मग प्रवेश का नाही?

**जीवन** : देणगी द्यायला माझ्याजवळ पैसे नाहीत. देणगीवाल्यांचे अर्ज

वर ठेवले आणि बिगरदेणगीवाल्यांचे खाली टाकले. देणगीवाल्यांत इतके नालायक असतील याची मला कल्पना नव्हती.

**मुलगी** : माझं नाव सांगू नका हं!

**जीवन** : पण तुम्ही तुमचं नाव मला सांगितलंय कुठं?

**मुलगी** : संगीता. पण मला अहो जाहो म्हणू नका.

**जीवन** : मी जीवन... तू जाशील ना सुखरूप?

**मुलगी** : जाईन. थँक्यू व्हेरी मच. प्रवेश मिळवा हं. बेस्ट लक्! (जाते.)

(जीवन संस्थाकार्यालयाकडे जातो. दारात उभा. लोडतक्क्या अशा सरंजामावर चेअरमनसाहेबांची स्वारी बसली आहे. चेअरमनच्या एका बाजूला दोन प्राध्यापक व दुसऱ्या बाजूला एक प्राध्यापिका आहे. प्राध्यापिकेच्या हातात ग्लास आहे. एकजण त्यात दारू ओततो. दुसरा त्यात सोडा ओततो. प्राध्यापिका तो ग्लास चेअरमनच्या हातात देते.)

**चेअरमन** : सामान्य लोकांचा दिवस चहाच्या प्याल्याशिवाय सुरू होत नाही. बेड टी. आमचा दिवस या प्याल्याशिवाय सुरूच होत नाही. बेड ड्रिंक!

**एक जण** : आपण काय सामान्य? आपण असामान्य!

**दुसरा** : आपलं सगळं वेगळंच!

**चेअरमन** : (निम्मा ग्लास पिऊन) इतर लोकांना प्यायलं म्हणजे काम करता येत नाही. आम्हाला प्यायल्याशिवाय काम करता येत नाही. प्यायला सुरुवात झाली की आमची बुद्धी फुलायला लागते. लोकांना सकाळी हवी असते सूर्याची लाली. आम्हाला हवी असते या पेल्याची लाली.

**दोघे जण** : वा! वा! वा! वा!

**चेअरमन** : पेला काठोकाठ भरावा पुरुषांनीच पण उचलून द्यावा बाईनंच. पेल्यातल्या पेयाच्या सळसळीबरोबरच बांगड्यांची किणकिण त्यात मिसळली पाहिजे.

**दोघे** : बरोबर आहे! बरोबर आहे!

**चेअरमन** : बरं. कामाचं बोला. पैसे किती मिळाले?

**एक जण** : दहा लाख.

**चेअरमन** : दहाच लाख? आम्हाला वाटलं, पाचपन्नास किमान वीसपंचवीस लाख मिळतील.

**एक जण** : बोर्डाच्या यादीतली पोरं, आपल्याच संस्थेच्या शाळेतली पोरं, काही सरकारी अधिकाऱ्यांची पोरं यांना फुकटातच प्रवेश द्यावा लागतो ना!

**जीवन** : (आत घुसत) चेअरमनसाहेब, आणि मला मात्र प्रवेश नाही? मी नव्वद टक्के मार्क मिळवलेत. झोपडपट्टीत राहून आणि फूटपाथवर म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली अभ्यास करून. माझे आईवडील मजूर आहेत. त्यांच्या सदऱ्याला पैशाचा खिसाच नाही, हा काय त्यांचा गुन्हा? दुसऱ्या कुठल्याही गावी मी जाऊ शकत नाही. प्रवेश मिळाला तर कधीतरी रेल्वेतून प्रवास करू शकेन नाहीतर आत्ताच रेल्वेखाली जाईन. नालायकांना प्रवेश मिळतो अन्...

**चेअरमन** : ये रं बाळा. बैस बैस. मी देतो तुला प्रवेश. पण एक करशील? कमवा आणि शिका. आम्ही सांगू ते काम करायचं. कुणालाही सांगायचं नाही. आमच्याशी एकनिष्ठ राहिलं पाहिजे.

**जीवन** : पण काम...?

**चेअरमन** : हो म्हण, ... लगेच प्रवेश.

**जीवन** : हो, पण,...

**चेअरमन** : पण बिण काय नाय... आता काम करायचं हाच पण करायचा. आण तुझी कागदं इकडं. बघू. (कागद बघून) सेक्रेटरी, हे बेणं चांगलं दिसतंय. उपयोग करून घ्या. (कागद देतो.) पोरा, लक्षात ठेव. नुसती हमाली करून झोपडी सुटत नाय. हमालीत माल मिळवावा लागतो, म्हंजी कमाल होती. सेक्रेटरी, पोरगं कवळं आहे. निर्मळ दिसतंय. याचा संशय कुणाला येणार नाही. याच्या हातानं माल पाठवत चला.

**जीवन** : कसला माल?

**चेअरमन** : बघायचं नाय. बोलायचं नाय.

**जीवन** : अन् पोलिसांनी पकडलं तर?

**चेअरमन** : बोलायचं नाय! तुला सोडवण्याची व्यवस्था आम्ही करू. तू आम्हाला सोडायचं नाय. आम्ही तुला सोडणार नाय.

प्रोफेसर महाशय, या पोराला बाहेर उभं करा अन् फोनवरून आपल्या माणसाला मेसेज द्या. पोरीनं करावं तसं याचं वर्णन करा अन् माल घेऊन यायला सांगा. द्या म्हणावं याच्या हातात आणि द्या एक पत्ता तोंडात.

**प्रोफेसर** : साहेब, कॉलेजात हे असं?

**चेअरमन** : कॉलेजातच चांगलं. कॉलेज म्हणजे सरस्वतीचं मंदिर नव्हं का? कुणाला संशय येणार नाय.

**प्रोफेसर** : आणि पोलीस?

**चेअरमन** : प्रिन्सिपॉलच्या परवानगीशिवाय पोलीस कॉलेजात पाय टाकू शकत नाहीत. प्रिन्सिपॉलना नीट समज द्या. आम्ही जातो. कामं फार पडलीत. सेक्रेटरी, तुम्ही दुरून नजर ठेवा आणि आमचा माल पाठविण्याची व्यवस्था करा. लवकर. तिकडे आमची राजकारणं खोळंबलीत.

(चेअरमन उठताच एक जण टोपी देतो, दुसरा काठी देतो, तिसरी जोडे पुढे करते. सर्व जातात. जीवन एकटाच पुढे येऊन वाट पाहत राहतो. घाबरल्याने त्याला घाम फुटतो. तो तो रुमालाने पुसत इकडे तिकडे पाहतो. इतक्यात एक इसम त्याच्या अगदी जवळ येऊन उभा राहतो. दुरून सेक्रेटरी येऊन नजर ठेवतो.)

**इसम** : तुझं नाव?

**जीवन** : जीवन.

**इसम** : तुला प्रवेश कुणी दिला?

**जीवन** : चेअरमनसाहेबांनी.

**इसम** : कामपण दिलं ना?

**जीवन** : हो ना.

**इसम** : हा बघ. हा टिफिनचा डबा आहे. मी सांगतो त्या पत्त्यावर सांगतो त्या माणसाला नेऊन द्यायचा.

**जीवन** : पण मी त्या माणसाला कुठं ओळखतोय?

**इसम** : तुझं नाव तुला तो तुझ्या कानात सांगेल. मी त्याला फोन करतोय. तो तिथं हातांची अशी घडी घालून उभा राहील. तू त्याला त्याचं नाव विचार. त्याचं नाव आणि पत्ता ऐक. (कानांत सांगतो). तू हुषार आहेस, म्हणं. नाव पत्ता चुकणार

नाहीस. एकदा मला सांग. (जीवन कानात सांगतो.) शाब्बास. धर हा डबा.

**जीवन** : (घेऊन) अरे बापरे, फारच जड आहे.

**इसम** : पण हलका आहे, असं नाटक करायचं. तोंडानं हसायचं. फारच हात दुखला तर खाली पण पायाजवळ ठेव. फार गरम आहे म्हणून खाली ठेवला, असं नाटक कर. हातावर फुंकर घाल. पण दुसऱ्या कुणालाही हात लावू देऊ नकोस. डबा हातात देण्यापूर्वी त्या माणसाला मला फोन करायला सांग. तो बोलल्यावर तू पण बोल. मी हो म्हटल्यावर देऊन टाक.

**जीवन** : फारच जोखमीचं दिसतंय हो हे काम. असली कामं मी कधी केली नाहीत हो!

**इसम** : हुषारीची फुशारकी मारतोस नव्हं! मग शिकून दाखव. तुझ्या शाळंतल्या हुषारीचा काय उपयोग हाय काय? आम्ही शिकलो नाय. पण पैशाला कधी कमी नाय.

**जीवन** : मला भीती वाटते हो. पोलिसनी पकडलं म्हणजे?

**इसम** : बोलायचं नाय. माझं नाव तुला ठाऊकच नाय. पत्ताबी ठाऊक नाय. दुसऱ्या कुणाचं नाव घेऊन काय उपयोग नाय. सगळ्यांच्या काखा वर.

**जीवन** : एखाद्या चोरानं डबा चोरला तर?

**इसम** : तू नुसतं त्या चोराचं नीट वर्णन कर. दुसऱ्या दिवशी त्याची लाश तुला दिसंल. सगळ्या टोळ्यांची बातमी हाय आमच्यापाशी.

**जीवन** : नको हो. मला भय वाटतं.

**इसम** : तू हे काम घेतलं आहेस. आता सुटका नाय. घाबरू नकोस. महिन्यातून फक्त पाच सात वेळ काम अन् महिनाभर चैन. घे. मी पळतो. (जातो.)

(जीवन डबा घेऊन क्षणभर उभा राहतो. इतक्यात एका बाजूने एक मिरवणूक येते. दुसऱ्या बाजूने दुसरी मिरवणूक येते. तो मधे सापडतो. पहिली मिरवणूक सर्वांना बुक्का लावते व उधळते. दुसरी मिरवणूक गुलाल लावते व उधळते. पहिल्या मिरवणुकीत रॉकेलचे डबे आणि झांजा वाजवताहेत. दुसऱ्या मिरवणुकीत डफल्या आणि बाजा वाजवताहेत. पहिल्या मिरवणुकीत 'आवाज कुणाचा?

राजमोहनचा', 'यंदा जी. एस्. राजमोहन! विरोधकांचे अबाऊट टर्न', 'सच्चा जी. एस्. राजमोहन! कच्चा उसका आपोझिशन' अशा घोषणा; तर दुसऱ्या मिरवणुकीत 'जी एस्. के बारेमे नही सवाल! हमारा जी. एस्. रमणलाल', 'रमणलाल! रमणलाल! त्याच्या गळ्यात जी. एस्. ची माळ', 'रमण विल बी सिलेक्टेड आदर्स विल बी रिजेक्टेड' अशा घोषणा. असे घोषणायुद्ध होते. मग पहिल्या मिरवणुकीत उमेदवाराला मधे ठेवून भांगडा नृत्य होते, तर दुसऱ्या मिरवणुकीत त्यांच्या उमेदवाराला मधे ठेवून इंग्रजी प्रकारचे नृत्य होते. मग दोन्ही मिरवणुका आपापल्या उमेदवारांना खांद्यावर घेऊन नाचवतात. त्यानंतर पहिली मिरवणूक मानवी मनोरा करते. त्यांचा उमेदवार सर्वांत वर चढतो. मग त्याचा 'राजमोहनचा विजय असो!' असा जयजयकार होतो. असा मनोरा करायला रमण घाबरतो.)

**रमण** : जी. एस्. होणं म्हणजे काय सर्कस करणं? आम्ही हिंदी सिनेमातल्या नाचांच्या स्पर्धा लावणार आहोत. दांडिया रास खेळणार आहोत. इंग्रजी डान्स करणार आहोत. डान्स!

(रमणचे पाठीराखे 'रमणलालचा विजय असो! डान्स' अशा घोषणा करतात. तर राजमोहनचे पाठीराखे 'मनोरा' 'मनोरा' म्हणून त्यांच्या मागे लागतात. 'भ्याले', 'घाबरले', 'टॉयलेटला गेले' म्हणून ओरडतात. दोन्ही पक्षांची मारामारी सुरू होते.)

**एक शिपाई** : (येऊन) अरे बापरे! प्रिन्सिपॉलसाहेबांना सांगितलं पाहिजे. (प्रिन्सिपॉलना घेऊन येतो.)

**प्रिन्सिपल** : अरे महादबा, तू व्हाइसप्रिन्सिपलसाहेबांना सांग. मी चेअरमनसाहेबांच्याकडे चाललोय. (घाईघाईने जातात.)

**व्हाइसप्रिन्सिपल** : (शिपायाबरोबर येत) अरे, जरा व्हा पुढे. मधे पडा. दोघांना बाजूला करा. अरे बापरे, मला अर्जंट अपॉइंटमेंट आहे. उशीर झाला. प्रोफेसरांना बोलवा. (जातात.)

(गडबडीमुळे प्रोफेसर लोक भराभर सटकतात. 'आम्ही आधीच गेलो होतो म्हणून सांगा' शिपायाला ते म्हणतात. शिपाई पाठ फिरवून उभा राहतो, म्हणतो, 'आपल्याला काय दिसत नाय!')

(धुमश्चक्री सुरू होते. रमण लांबून म्हणतो, 'अरे, हो पुढे. मी आहेच मागे.' राजमोहन किंकाळी मारून पडतो. त्याचा खून झालेला आहे. सर्वजण पळून

जातात. राजमोहन ‘पाणी, पाणी’ करतो.’ जीवन त्याला पाणी पाजतो. तो मरतो. पोलीस येतात. जीवन आधी त्याच्या छातीतला चाकू काढतो. रुमालाने रक्त थांबवायचा प्रयत्न करतो. म्हणून त्याच्या हाताला रक्त लागलेले असते. पोलीस त्याला पकडतात. तो डबा उचलतो आणि पोलीसबरोबर जातो.)

# आग लागो या सगळ्याला

## अंक दुसरा

(जीवन आणि संगीता दोन बाजूंनी येतात.)

**संगीता** : जीवन.

**जीवन** : संगीता. संगीता, तू माझ्या बाजूनं साक्ष दिलीस म्हणून मी सुटलो. राजमोहनचा खून भाडोत्री गुंडांनीच केला होता. गुंड अर्थातच बेपत्ता आहेत आणि त्यामुळे त्यांना पैसे कोणी दिले हेही गुलदस्तातच आहे. सगळा पैशाचा खेळ आहे. प्रचंड पैसा पाहिजे. भुंकणारं कुत्रं पावाचा तुकडा टाकला की पाय चाटतं तसं नोट टाकली की कितीही मोठा मनुष्य असो पाय चाटतो.

**संगीता** : तुझी पैशाची सोय झालीय ना?

**जीवन** : मीपण या दारुड्या चेअरमनचे पाय धरले.

**बाबा** : कशासाठी?

**जीवन** : त्यानं मला काम दिलं होतं स्मगलिंगचा माल वाहून नेण्याचं, ते सोडून देण्यासाठी. मला फारफार भीती वाटते म्हणून मी सांगितलं. नशीब, सोन्याचा टिफिन पोलिसांनी उघडून बघितला नाही! हा दारुड्या स्मगलर शिक्षणसंस्थेचा चेअरमन!

**संगीता** : मरू दे. पण तुझं काय?

**जीवन** : माझ्या आईवडिलांनी त्यांच्या ठेकेदाराचे पाय धरले आणि मला काम मिळवलंय. संध्याकाळी दोन तास त्याचे हिशेब

लिहिण्याचं. जेमतेम दोन वेळचं जेवण निघेल.

**संगीता** : आणि कॉलेजची फी?

**जीवन** : ई. बी. सी. अर्ज भरलाय. बघू या.

**संगीता** : शिकून तू काय करणार आहेस, जीवन? खूप खूप पैसा मिळव.

**जीवन** : नाही संगीता. मला इंजिनिअर व्हायचंय. साधासुधा इंजिनिअर नव्हे. स्पेस इंजिनिअर. रशिया – अमेरिकेच्या आधी आपलं यान मंगळावर गेलं पाहिजे.

**संगीता** : मी येऊ तुझ्याबरोबर?

**जीवन** : आयडिया! आपण दोघं जाऊ या! खूप मजा येईल. मंगळावरच घर बांधू या.

**संगीता** : त्याला नाव काय ठेवायचं?

**जीवन** : शुभमंगल! त्या घरात राहून मंगळावरचं धन या गरीब पृथ्वीला पाठवू या. सबंध मंगळ आपलाच होईल! आपल्याइतकं श्रीमंत कोण असणार आहे? या पृथ्वीवर आता पैशाला किंमत राहिलेली नाही. निसर्गाची संपत्ती संपल्यावर पैशाच्या संपत्तीला काय चाटायचंय?

**संगीता** : जीवन, कित्ती सुंदर बोलतोस तू!

**जीवन** : संगीता, हे मंगळावरचं धन आणण्याचं शास्त्र शिकण्याची लायकी या एकातरी पैसेवाल्याची आहे का? तो रमण काय करणार आहे पुढे?

**संगीता** : डॉक्टर! देणगी घेऊन प्रवेश देणारी कॉलेजं आहेतच! देणगी देऊन निकालही मिळतातच.

**जीवन** : म्हणजे पेशंटस्‌चा निकाल!

**संगीता** : नुसता निकाल नव्हे! श्रीमंती निकाल!

**जीवन** : भोगा म्हणावं श्रीमंतीचा खेळ. चल, तासाला जाऊ या.

**संगीता** : आज तास नाही आहेत. 'कॉलेज चालू आहे, पण तास चालू नाहीत.' अशी नोटीस लावली आहे प्रिन्सिपॉलनी.

**जीवन** : का?

**संगीता** : स्टाफ मीटिंग आहे म्हणे! 'अभ्यास अधिक चांगला कसा होईल,' या विषयावर!

**जीवन** : तास बुडवून? रोज नवी सबब! रोज निम्मे प्राध्यापक रजेवर आणि जे हजर ते म्हणे कॉलेजच्या कमिट्यांवर. आणि रोज नवीन महोत्सव! काय कॉलेज आहे की खेळखंडोबा?

**संगीता** : जीवन, सगळं जीवन हाच मोठा खेळ आहे, बाबा! अरे, आता कॉलेजात दांडिया रास स्पर्धा आहेत. तू होशील माझा पार्टनर?

**जीवन** : माझ्याजवळ पेन विकत घ्यायला पैसे नाहीत. मी दांडिया कुठून घेऊ?

**संगीता** : मी देऊ?

**जीवन** : आणि फेटा?

**संगीता** : घे माझी ओढणी!

**जीवन** : पण मला नाचता येत नाही.

**संगीता** : मी शिकवते ना!

**जीवन** : चला. म्हणजे कॉलेजमध्ये येऊन हेच शिक्षण!

(संगीता जीवनला दांडिया रास शिकवते. आधी तो धडपडतो. मग चांगला नाचतो. नाच रंगतो. क्लायमॅक्स होत असतानाच रमण येतो.)

**रमण** : ओहो! सुंदर! ब्यूटिफूल. संगीता, तुझा नाच वंडरफूल आहे! तू होशील माझी पार्टनर? मी दांडिया रासची जितकी प्रॅक्टिस केली आहे तितकी कुणी केली नसेल! (नाचून दाखवतो. स्पर्धाद्वंद्व होते.)

**संगीता** : खरं आहे!

**रमण** : जिकडे जिकडे दांडिया स्पर्धा झाल्या त्यांत मी पहिली बक्षिसं मिळवली आहेत.

**संगीता** : बरं झालं! ती तरी बक्षिसं मिळाली!

**रमण** : मी सूर्यासारखा गडद पिवळा रेशमी ड्रेस शिवलाय माझ्यासाठी. तुला आगीसारखी लालभडक नायलॉनची साडी देईन प्रेझेंट. आपली जोडी पहिला नंबर मिळवील. सगळी बक्षिसं नक्की आपल्यालाच मिळतील.

**संगीता** : तुलाच घे. मला नको आहेत ती. मिळाली तर अभ्यासातली बक्षिसं हवी आहेत मला.

**रमण** : खोटं. तू दांडियाची प्रॅक्टिस कशाला करीत होतीस?

**संगीता** : खेळापुरती. स्पर्धेसाठी आणि नंबरसाठी नव्हे. स्पर्धेसाठी आणि नंबरासाठी दांडिया खेळायचा तर दिवसरात्र तेवढा एकच विषय डोक्यात आणि अंगात नाचवावा लागेल. कॉलेजात मी दांडिया विषय नाही घेतलेला तुझ्यासारखा. मला माझे अभ्यासाचे विषय आहेत.

**रमण** : तुझा विषय तुझ्यासमोरच आहे. त्याचाच अभ्यास चालला होता ना मघाशी?

**जीवन** : रमण, बऱ्या बोलानं चालू लाग. गेट आऊट.

**रमण** : गाठ माझ्याशी आहे. मी जी. एस्. आहे. मी काय करू शकतो तू पुरतं पाहिलेलं नाहीस. तुमची गाठ मी पडू देणार नाही. संगीता माझी मुलगी आहे. तू गाठ एखादी झोपडपट्टीवाली.

**जीवन** : थांब. तुला झोपडपट्टीच दाखवतो. साल्या, मुली काय पैशाला मिळतात? तुझा पैसा घाल दुसऱ्या एखाद्या हपापलेल्या पोरीच्या पदरात. माफी माग हिची. माफी माग. पाय धर.

(जीवन रमणचे नरडे धरतो. मारामारी होते. आरडाओरडा ऐकून चार लोक येतात. प्राचार्य, व्हाइसप्रिन्सिपॉल, प्राध्यापक, अगदी बरोबर गेल्यावेळप्रमाणेच पळून जातात. शिपाईपण पाठमोरा उभा राहतो. यावेळी यांचे मूकनाट्य व्हावे. म्हणजे तोंडे हलावीत; पण आवाजाची आवश्यकता नाही. मजकूर प्रेक्षकांना पाठच आहे! लोकातीलच एक माणूस पूर्वीप्रमाणेच मारामारी सोडवतो. सर्व जातात.)

(काळोख. उजेड होतो तेव्हा मुलामुलींचा दांडिया रंगात आलेला आहे. अनेक जोड्यांनी मिळून गोल धरलेला आहे. रमण आणि संगीता समोरासमोर येतात तेव्हा रमण संगीताला एकदम ओढून मध्यभागी नेतो. तो जोरात नाचाला सुरुवात करतो. पण संगीता पळून जाते. तिच्यामागे जीवनपण पळून जातो. रमण 'बघून घेईन' अशी मुद्रा करून नाच सुरू करतो.)

(काळोख. पुन्हा उजेड होतो. तेव्हा रोज डे चालू. एकएक मुलगा माइकपाशी येऊन आपली कविता वाचून दाखवून गुलाब व कविता पुढे करतो. मुलीचे नाव पुकारतात. मुली पुढे येतात व टाळ्यांच्या गजरात, जल्लोषात घेतात. काही मुली लाजतात तेव्हा 'घ्या हो, घ्या हो! फुले माझी – बना राजी घ्या हो' असे तालात गायन होते. मुलगी पुढे आली नाही तर तिला ती असेल तेथे कविता व

फूल नेऊन दिले जाते. स्टेजवर सूटबूटमध्ये रमण व त्याचे मित्र विद्यार्थी आहेत. वेगवेगळ्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे गुलाब आणले आहेत. कुणी गुलाबांच्या फुलांची भेटपत्रे आणली आहेत.

कविता

१) तुम्ही कधी बोलत नाही
कधी हासून बघत नाही
पण तुम्ही कॉलेजात येत नाही
तेव्हा आमचे लक्ष लागत नाही
शुभेच्छेसह – मिस प्रणीता

२) तुमच्या केसातली पिन पडली
ती आम्ही जपून ठेवली (पिन दाखवतो)
माफ करा, तिची किंमत नाही दिली
म्हणून गुलाबफुले भेट दिली
शुभेच्छेसह – कुमारी अनुष्का

३) तुमच्या आठवणीने बेजार होतो
केमिस्ट्रीच्या जारमध्ये भलतेच रसायन ओततो
आता जर का स्फोट झाला
जबाबदार धरणार कोणाला?
शुभेच्छेसह – श्रीमतीजी रसा

(यानंतर रमण येतो.)

(मुलांचा प्रचंड आरडाओरडा. तो हात वर करतो. एकदम उत्सुकता पूर्ण शांतता)

**रमण :** तुम्ही आमच्यावर सतत रागवता
आम्हाला मुळीच समजून न घेता
पण एकदा जरी या हृदयात बघाल डोकावून
दिसेल तुम्हाला हेच फूल आलेले फुलून
शुभेच्छेसह – मिस संगीता

(संगीता पुढे जात नाही. रमण फूल व कविता घेऊन संगीताकडे जाऊ लागतो. संगीता निघून जाऊ लागते. 'घ्या हो', 'घ्या हो' अशा तालात गिल्ला सुरू होतो. मुले संगीताची वाट अडवतात. कोणीतरी संगीताला रमणकडे ढकलते. रमण तिच्या हातात फूल कोंबण्याचा प्रयत्न करतो; तेव्हा तिचा हात धरतो.

कवितेची सुरळी करून तिच्या गळ्यातल्या माळेत अडकवतो. जीवन सगळ्यांना बाजूला करीत जातो व फूल आणि कविता घेऊन स्टेजवर माईकपाशी येतो.)

**जीवन** : तुम्ही सक्ती करू शकत नाही. खेळीमेळी म्हणायची आणि मुलींना धक्काबुक्की करायची? मी या प्रकाराचा निषेध करतो.

(तो कविता फाडतो. गुलाबाच्या पाकळ्या करून फेकून देतो. रमण आणि त्याचे मित्र जीवनवर चाल करून जातात. मुलींना धक्काबुक्की आणि मुलांच्यात मारामारी सुरू होते. मुलींचा आरडाओरडा, किंकाळ्या 'जाऊ दे. ढकलतंय कोण? मेले. मेले. वाट द्या हो. सर... अग आईऽ गऽ... मवाली मेले...' इ. मुलांचे शब्द. 'मारा. मारा. कुठं आहे तो भिकारडा? कानामागून आला आणि शिरजोर झाला. झोपडपट्टी संस्कृती नष्ट करा... अरे, पुरे... एक खून झाला तेवढा बस नाही का?... पळा... पळा...' इतक्यात संगीता किंचाळते, 'वाचवा हो, कोणीतरी जीवनला संभाळा हो. जीवनला मारतील. जीवन, तू कुठे आहेस? जीवन...' गोंधळ वाढतो. काळोख होतो.)

(प्रकाश येतो. तेव्हा एका चबुतऱ्यावर रमण व त्याचे मित्र मद्यपान, धूम्रपान आणि खानपान करीत आहेत. गर्दच्या धुंदीचे नृत्य.)

**रमण** : किती प्यालो तरी साला डोक्यातून किडा जात नाही. एक साली कवडी किंमतीची पोरगी. सगळ्यांच्या देखत माझा अपमान करते? माझी कविता नाकारते? माझा हात झिडकारते? माझ्यावर तो झोपडपट्टीवाला गुंड सोडते?

**एक जण** : दोस्त, क्या करना है बोलो! आम्ही खाल्ल्या मिठाला न् प्याल्या दारूला जागणारे लोक आहो.

**दुसरा** : बरोबर.

**तिसरा** : बिलकूल ठीक.

**एकजण** : तो पोरगा? ती पोरगी? की दोन्ही?

**दुसरा** : किती टक्के ॲक्शन? दहा... वीस... तीस... चाळीस...

**तिसरा** : अरे, रमणभाईला विचार करू दे.

**दोघे** : ठीक. ठीक. बिलकूल ठीक.
(इतक्यात जीवन येतो.)

**रमण** : आवो भैय्या जीवन आवो! मजा करो! ये जीवन. झालं गेलं विसरून जाऊ. सगळं या पेल्यात बुडवू. घे. अरे, मला ठाऊकाय तुला सवय नाही म्हणून. मी शिकवतो ना. अरे,

मला ठाऊकाय तुला सवय नाही म्हणून. मी शिकवतो ना. अरे, कॉलेजात येऊन हेच शिकावं लागतं. अरे, पंचामृतानं देव वश होतात तसे या कॉकटेलनं माजलेले रेडेसुद्धा गोगलगाय बनतात. घे. अरे, हाच आधुनिक युगाचा मंत्र आहे. आणि ही पांढरी गुरूकिल्ली. हिनं सगळी कुलपं खुलतात. साधीसुधी नाही आहे ही. गर्दवाली आहे. घाबरू नकोस. खूप लोक ओढतात. एक श्वास घेतला की सगळी दुःखं खतम्! अरे शिकून, पुस्तकं पाठ करून काय उपयोग नाय. ज्याचा वशिला त्याची बाजी. सगळे पाजी आहेत. सगळ्यांना पाजा. जा. अरे, पुस्तकाची पानं पिंजारून काय उपयोग नाय. नोटांची बंडलं पिंजारावी लागतात. सांग, नव्वद टक्के मार्क मिळून तुला प्रवेश मिळाला होता? तेढे अंगुलीसेही घी निकलता है! सरळपणाचा काय उपयोग नाय. तू हुषार आहेस. चांगला आहेस. माझ्याशी दोस्ती कर. तुला काय पाहिजेल ते देतो. किती पैसे पाहिजेत बोल. पुनः एकदा नुसतेच मार्क मिळवून फसू नकोस. मार्क नकोत. पैसे हवेत. बोल. बोल. काय करतोस? दोस्ती की दुष्मनी?

**जीवन** : माफ करा. दोन्हीही नाहीत. (जातो.)

(काळोख)

(प्रकाश येतो तेव्हा जीवन एकटाच वर्गात बसलेला. खूप वेळाने एक प्राध्यापक येतात.)

**प्राध्यापक** : अरे, तू आहेस का? मला वाटलं कुणीच नाही. मी तिकडून बघितलं. तिकडच्या अँगलनं तू दिसत नाहीस.

**जीवन** : सर, मी घंटेच्या आधीपासून वाट बघतोय.

**प्राध्यापक** : असं होय? थांब. हजेरी मांडू.

**जीवन** : हजेरी कसली सर? मला प्रेझेंट मांडा. बाकी सगळे ॲबसेंट मांडा.

**प्राध्यापक** : नो.. नो.. नो.. नो. सगळ्यांना प्रेझेंट मांडावे लागतात. कॉलेजात विद्यार्थी हवेत ना?

**जीवन** : तुम्हाला पगार मिळण्यासाठीच ना?

**प्राध्यापक** : नो.. नो.. नो.. नो. आम्ही शिकवायला आलोच आहोत

ना? पण सगळे विद्यार्थी खाजगी क्लासेसनाच जातात.

**जीवन** : का? विद्यार्थी क्लास बुडवत नाहीत. क्लासेस कॉलेजच्या वर्गापेक्षा मोठे असतात. विद्यार्थी दाटीनं बसतात. कारण क्लासमध्ये चांगलं शिकवतात. तुम्ही का तसं शिकवत नाही? तुम्ही चांगलं शिकवाल तर विद्यार्थी क्लासमध्ये कशाला जातील? लोकांना काय पैसे फुकट घालवायची हौस आहे? आणि विद्यार्थ्यांना दोन ठिकाणी जाण्यात वेळ वाया घालवायचा आहे?

**प्राध्यापक** : आम्ही काही विद्यार्थ्यांना 'जा' म्हटलं नाही.

**जीवन** : तुम्ही विद्यार्थ्यांना 'या' म्हटलंत का? तुम्ही 'या' म्हणता– आपल्या घरी. क्लासच्या दसपट फी घेऊन तुम्ही विद्यार्थी घरी घेता. तिथं तुम्ही चांगलं शिकवता! आमच्यासारख्या गरिबांनी काय करायचं?

**प्राध्यापक** : आम्हीही गरीबच आहोत. म्हणूनच आम्हाला घरचे क्लास चालवावे लागतात.

**जीवन** : सरकारी पगार घेऊन गरीब? सरकारी नोकर चोवीस तास नोकर असतात. तुम्ही राहता का कॉलेजात दिवसभर?

**प्राध्यापक** : खाजगी कंपन्यात किती पगार मिळतात?

**जीवन** : तुम्ही का जात नाही खाजगी कंपन्यांत? तिथं घेत नाहीत म्हणूनच तुम्ही इथं येता. खाजगी कंपन्यांत मरेस्तोवर कामं करावी लागतात. इथं बरं आहे. विद्यार्थी नाहीत पण पगार आहेत. आणि घरीपण उत्पन्न चालूच आहे.

**प्राध्यापक** : तुम्ही फारच बोलता बुवा.

**जीवन** : तुम्ही चांगलं शिकवलं असतं तर कशाला बोललो असतो?

**प्राध्यापक** : आम्ही कसं शिकवतो, हे संस्था बघते. सरकार बघतं.

**जीवन** : कागदोपत्री. ते करून घ्यायला काम लागत नाही, दाम लागतो. जाऊ द्या. प्लीज – शिकवा सर. मी शिकायला आलोय. शिकलो नाही तर मरेन.

**प्राध्यापक** : नो. नो. नो. नो. आज माझा मूड गेलाय. तुम्ही माझा मूड घालवलात. (जातात.)

(जीवन उठून स्टाफरूममध्ये जातो. स्टाफरूममध्ये चहापाणी, खाणेपिणे

चालू आहे. बायकांचे नटणे, मुरडणे. अभ्यास सोडून सर्व काही.)

**एक**

**प्राध्यापक** : तुम्ही आत कसं आलात? ही स्टाफरूम आहे.

**जीवन** : बाहेर शिपाई नाही आहे. आणि स्टाफ कुठं भेटणार? स्टाफरूमध्येच ना?

**प्राध्यापक** : स्टाफरूममध्ये कशाला? वर्गात भेटतील ना.

**जीवन** : वर्ग होतील तर ना! सर, तुमच्याच विषयाच्या मला डिफिकल्टीज आहेत. सांगाल?

**प्राध्यापक** : तुम्ही नीट अभ्यास करीत नाही म्हणून डिफिकल्टीज येतात.

**जीवन** : प्राध्यापक नीट शिकवीत नाहीत म्हणून डिफिकल्टीज येतात. हे माझे मी पुस्तक वाचून सोडवलेले प्रॉब्लेम्स आहेत. तपासून द्याल?

**प्राध्यापक** : प्रॉब्लेमच आहे. वेळ मिळणं कठीण आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचा प्रत्येक प्रॉब्लेम सोडवणं अशक्य आहे.

**जीवन** : किती आहेत माझ्यासारखे? कुठे आहेत?

**प्राध्यापक** : आज तरी मला वेळ नाही. पुन्हा या.

**जीवन** : सर, किती दिवस मी तुमची भेट घ्यायचा प्रयत्न करतोय. थोडा वेळ नाही देणार?

**प्राध्यापक** : माफ करा. पुनः बघू. आत्ता मला गेलंच पाहिजे. मला काम आहे.

**जीवन** : सर, बाहेरची कामं कॉलेजच्या कामापेक्षा महत्त्वाची आहेत?

**प्राध्यापक** : होय. सॉरी. पुनः भेटू.

**जीवन** : असेच?

(प्राध्यापक जातात. 'आज नवीन एल्. आय्. सी. पॉलिसीज मिळणार आहेत.', 'मला इन्कमटॅक्सच्या केसेस मिळणार आहेत.', 'माझी आपली पोस्टाची सर्टिफिकिटस्,' असे म्हणत जातात. एकजण 'मला शेअर्स घ्यायला जायचंय. तुमचं बरंय. तुमचे घरीच क्लासेस आहेत' असे म्हणतात. दुसरा म्हणतो, 'वैताग येतो दिवसभर तेचतेच शिकवून. पण काय करणार?' असे म्हणून सर्व जातात. जीवन वहीपेन घेऊन एकटाच उभा.)

**जीवन** : रोजच्या अभ्यासातल्या समस्या हे प्राध्यापक सांगत नाहीत. अभ्यासाबाहेरचं ज्ञान हे काय देणार? चला. आमची

मंगळावरची स्वारी बहुधा झोपडपट्टीपर्यंतच. (जातो.)

(प्राचार्य कार्यालय. प्राचार्य स्थानापन्न.)

**जीवन** : सर, येऊ का?

**प्रिन्सिपल** : कामं फार पडलीत. पण या. लवकर बोला.

**जीवन** : सर, तास होत नाहीत...

**प्रिन्सिपल** : कारण मुलं येत नाहीत...

**जीवन** : ती बाहेर क्लासला जातात. त्यांना गैरहजर मांडा.

**प्रिन्सिपल** : कॉलेजमध्ये रोज शेकडो विद्यार्थ्यांची हजेरी घेणं शक्य नसतं.

**जीवन** : शेकडो विद्यार्थी हजर असतील, तरना! इथं मुलंच नाहीत. क्लासहून चांगलं राहिलं निदान क्लासइतकं चांगलं इथं कॉलेजात का शिकवीत नाहीत?

**प्रिन्सिपल** : कॉलेजात सिलॅबस असतं. क्लासमध्ये फक्त परीक्षा असते.

**जीवन** : विद्यार्थी नाहीत. प्रोफेसर नाहीत. पण सिलॅबस आहे काय?

**प्रिन्सिपल** : हे पहा ही लोकशाही आहे! काय करणार?

**जीवन** : आम्ही गरीब काय करणार? केव्हा तास होणार? आम्ही काय क्लासला जाणार की प्रोफेसरांच्या घरच्या ट्यूशन्स घेणार? गरिबांनी शिकायचं की नाही? हे रोज डे, टाय डे, गॉगल डे, कॅप डे, फॅन्सी ड्रेस डे, असले डझनावारी डेज, खऱ्याखोट्या खेळांच्या स्पर्धा, संमेलनं आणि उत्सव बंद का करीत नाही?

**प्रिन्सिपल** : तुम्ही करा ना बंद.

**जीवन** : तुम्हाला अधिकार आहेत ना? तुम्ही खुर्चीवर बसला आहात ना? पण तुम्हीसुद्धा श्रीमंतांच्याच बाजूनं आहात. श्रीमंतांच्या पोरांनी गरिबांच्या पोरांच्या अभ्यासाचं वाटोळं केलं आहे. गरिबांनी शिकू नये आणि श्रीमंत होऊ नये, असाच तुमचा सगळ्यांचा डाव आहे. हे श्रीमंतांचं डर्टी पॉलिटिक्स आहे. हायराइज बिल्डिंग्जचं हे झोपडपट्टीवरील आक्रमण आहे. लोकशाही म्हणता ना? मग लोकशाही काय फक्त श्रीमंतांसाठी? गरिबांसाठी नाही? शिक्षण – चांगलं शिक्षण – हा गरीब नागरिकांचा हक्क नाही?

**प्रिन्सिपल** : जीवन, पंतप्रधानसुद्धा म्हणतात, मी पंतप्रधान आहे पण

काही करू शकत नाही. तसंच मीही म्हणतो. मी या कॉलेजचा प्राचार्य आहे; पण मी या कॉलेजात काही करू शकत नाही.

**जीवन** : उद्या एखाद्या साथीच्या रोगात पेशंटस् ऐकत नसतील तर डॉक्टरांनीही म्हणायचं काय, आम्ही काही करू शकत नाही? न करताच मिळत असेल तर करील कोण? गरिबांचं मरण आहे, एवढंच खरं. (जातो.)

(संस्था कार्यालय. चेअरमन दारू पीत बसला आहे. जीवन येतो.)

**जीवन** : येऊ का, साहेब?

**चेअरमन** : कोण, जीवन का? आता काय हवंय? प्रवेश घेतला ना?

**जीवन** : होय, साहेब. उपकार झाले. पण नदीत पाणीच नसावं तसं कॉलेजात शिक्षणच नाही.

**चेअरमन** : करायचंय काय शिक्षण?

**जीवन** : म्हणजे?

**चेअरमन** : शिकून कुणाचं कल्याण झालंय?

**जीवन** : म्हणजे?

**चेअरमन** : आम्ही शिकलो का? पण कॉलेज चालवतो. चालवतो की नाही?

**जीवन** : पण कॉलेज चालतंय कुठे? कॉलेज नावालाच आहे.

**चेअरमन** : मग? नावासाठीच कॉलेज पाहिजे. या कॉलेजमुळंच आमचं नाव होतंय. आम्ही निवडून येतोय. राजकारण खरं. शिक्षण खोटं.

**जीवन** : हे गरिबांना फसवायचं राजकारण आहे. शिक्षण दिल्यासारखं दाखवायचं अन् त्यांच्या तोंडाला पानं पुसायची. तुमचं सरकार शिक्षणावर हजारो कोटी रुपये खर्च करतं ना? तुम्ही लाखो लोकांना शिक्षणक्षेत्रात नोकऱ्या देता ना? मग सक्त कामं का नाही करून घेत? चांगलं शिकवलं तर गरिबांची मुलं पुढं येऊन देशाचे कर्तबगार नागरिक बनणार नाहीत काय? पण तुम्हाला न् तुमच्या संस्थेला दारू न् पैसे मिळाले की तुम्ही दुर्लक्ष करता. आणि शेवटी सरकारी न् खाजगी नोकऱ्या फक्त श्रीमंतांच्या पोरांनाच मिळतात जे पैसे मोजून त्या नोकऱ्यांच्या पात्रतेचे कागद पदरात पाडून घेतात! साहेब,

आम्ही गरिबांनी असंच मरायचं काय?

**चेअरमन** : जीवन, मी तुला प्रवेश दिला न् तू मलाच उलट बोलतोस? तुला मी कामसुद्धा दिलं होतं. पण तूच ते नाकारलंस. तुझा प्रवेश मी नाकारावा काय?

**जीवन** : नको, साहेब. माफ करा. मी जातो.

(काळोख. प्रकाश येतो तेव्हा बक्षीस समारंभ चालू आहे. टेबलावर प्राध्यापिका बाई, चेअरमन आणि प्राचार्य बसले आहेत.)

**प्राध्यापिका** : आणि आता शेवटची फक्त दोनच बक्षिसं उरली आहेत. यंदाची बेस्ट लेडी स्टुडंट – मिस संगीता.

(चेअरमनच्या हस्ते बक्षीस घेते.)

**प्राध्यापिका** : आणि आता – द लास्ट अँड द बेस्ट. द ऑलराउंड बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर – मिस्टर रमण.

(रमण बक्षीस घेतो. सर्वांशी हँडशेक करतो.)

**रमण** : काँग्रॅच्युलेशन्स मिस् संगीता!

(ती निघून जाते. तो रागवतो. काळोख.)

(दोन बाजूंनी जीवन आणि संगीता येतात.)

**संगीता** : जीवन

**जीवन** : संगीता... बरं झालं भेटलीस. उद्या परीक्षा सुरू. परीक्षा संपल्या की सुट्ट्या. सुट्ट्या म्हणजे तू तुझ्या घरी, मी माझ्या घरी.

**संगीता** : घर म्हणजे झोपडपट्टीच ना? जीवन, वाईट वाटून घेऊ नकोस. तुझी काय चूक? खरं सांगू, लोकलमधून जाताना रोज झोपडपट्टी बघते. पण, एकदा जवळून झोपडीत जाऊन मला बघायची आहे. बाहेरून बघताना खरंच आश्चर्य वाटतं, आतमध्ये माणसं कशी राहत असतील? अरे, गुरांचे गोठेसुद्धा मोठे असतात रे! आणि स्वच्छही ठेवावे लागतात. नाहीतर गुरं मरतील म्हणून. पण झोपडपट्टी नरकाएवढी घाण ठेवली तरी चालते. गुरं दूध देतात, शेण देतात. माणसं काय देतात? माणसं फक्त खायला मागतात. स्वराज्य आलं म्हणे. पन्नास वर्षं झाली म्हणे. कुठे आहे स्वराज्य? कुठे आहे स्वराज्य? कुठे आहे स्वराज्य? अरे, मुंबईत जागेचे भाव गगनाला

भिडलेत तरी गगनचुंबी इमारती उठताहेत. आणि जगातली सगळ्यांत मोठी झोपडपट्टी मुंबईत आहे! तिच्यातली निम्मी जमीन विकली तरी सर्व झोपडपट्टीवाल्यांना चार किंवा सहा मजली चाळी सहज बांधून देता येतील.

**जीवन** : संगीता, कशाला त्रास करून घेतेस? राजकारणी लोक प्रश्न सोडवीत नसतात. प्रश्न निर्माण करीत असतात. कारण प्रश्न असेल तर लोक यांना 'सोडवा' म्हणणार. यासाठी हे राजकारणी लोक भयानक हत्याकांड करणाऱ्या दंगलीसुद्धा घडवून आणतील! अग, रोग असेल तर डॉक्टर लागणार ना? पण हे डॉक्टर नाही आहेत, वैदूसुद्धा नाही आहेत. हे राजकारणी लोक म्हणजे भोंदू मांत्रिक आहेत. शब्दजाल पसरवणारे, करणी करणारे, मूठ मारणारे तांत्रिक आहेत. यांना फक्त आपलं महत्त्व वाढवायचं आहे आणि विरोध करणाराला खच्ची करायचं आहे. आपली संपत्ती वाढवायची आहे आणि दुसऱ्याची लुबाडायची आहे. आपली हीच शिक्षणसंस्था पाहा ना. इथं शिक्षण आहे?

**संगीता** : उद्या परीक्षा आहे. पैसे देणाऱ्यांना रात्री पेपर मिळतील, उत्तरपत्रिका मिळतील.

**जीवन** : हे मिळूनसुद्धा ज्यांना लिहिता येणार नाही त्यांना आणखी पैसे देऊन हवे तेवढे मार्क मिळतील.

**संगीता** : जी मुलं प्रोफेसरांच्या घरच्या ट्यूशनला जातात त्यांना प्रॅक्टिकलचे कॉलेजमध्ये मिळणारे सर्व मार्क मिळतात. पैसे ट्यूशनसाठी दिलेलेच असतात. पैसे या मार्कांसाठी दिलेले असतात.

**जीवन** : पैसा! पैसा! पैसा! काही लोकांजवळ नासून संपत नाही इतका पैसा तर काही लोकांजवळ दातांवर मारायला पैसा नाही.

**संगीता** : जाऊ दे जीवन. डोकं फुटेल. डोकं शांत ठेव. आपण दोघं शिकू या. तो मंगळ राहू दे. इथल्या झोपडपट्टीचं मंगल करू या. (जातात.)

(परीक्षा चालू आहेत. परीक्षेचे वातावरण. सर्वत्र विचित्र शांतता. घंटेचा

टोल होतो. एकदम बाहेरून चार बुरखेधारी एक मोठा कॅन घेऊन येतात. त्यांच्या हातात नंग्या तलवारी आहेत. एकजण ओरडतो, 'खबरदार कोणी हालचाल कराल तर!' वेगाने धावत जाऊन संगीताला ओढून आणतात. ती ओरडते. तिचे तोंड बांधतात. तिच्यावर रॉकेल ओतून तिला पेटवून देतात. ती पडते. सर्वजण कॅन टाकून पळून जातात. आता विद्यार्थी, स्टाफ, प्राचार्य येऊन दूर उभे राहतात. कोणीही तिच्याजवळ जात नाहीत. जीवन धावत येतो.)

**जीवन** : संगीता... संगीता... संगीता... एकजण तुला वाचवायला पुढं झाला नाही? तुला वाचवण्यासाठी आपला जीव पणाला लावावा असं एकाला वाटलं नाही? चार हजार माणसांच्या या शिक्षणसंस्थेत फक्त चार नराधमांनी तुला जाळलं? अरे, निदान मला तरी का नाही बोलवलंत? तुम्ही माणसं ना? तुम्हाला माणसांचे आवाज आहेत ना? अरे रडला का नाहीत? ओरडला का नाहीत? तुम्ही माणसं नाही आहात. तुम्ही भूतपिशाच्चं आहात. तुम्ही प्रेतं आहात. ही शिक्षणसंस्था नाही आहे. हे शवागार आहे. संगीताची लायकी कळण्याची अक्कलदेखील तुमच्यापैकी एकात नव्हती. (आता फायरब्रिगेडचे लोक येतात.) पाण्याचा टँकर कशाला आणलात? पेट्रोलचा टँकर का नाही आणलात? आग लागो या सगळ्यासगळ्याला! या इमारतीला, या फर्निचरला, आणि त्यात वावरणाऱ्या या सडक्याकुजक्या मुडद्यांना... संगीता, जग बदलण्याचं तुझं स्वप्न होतं. झोपडपट्टी फुलविण्याचं चिंतन तू करत होतीस. त्याचं बक्षीस तुला हे मिळालं! संगीताऽ

(तिच्याशेजारी गुडघ्यांवर बसून खूप शोक करतो.)

# मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

**अ काव्य**

१. नव्या युगाच्या कविता

२. 'नवरा नको ग बाई' आणि इतर पथनाट्ये

**ष्ट कथा**

३. 'नको हे पुरुषी मन' आणि इतर लघुकथा

४. शुभ मंगल! विज्ञान!! (विज्ञान कथा)

५. 'अवतार' आणि इतर कथा

**पै नाटक**

६. मस्तानीचा बाजीराव

७. सत्तेचा विजय असो!

८. प्रीती मिळेल का हो?

९. गजराज आणि वनराज

१०. आग लागो या सगळ्याला

११. चल ये, चल ये, चल ये, बयेऽ

१२. 'निम्मी माझी, निम्मी तुझी' आणि इतर एकांकिका

**लू पटकथा**

१३. स्वातंत्र्यवीर

**सा** कादंबरी

१४. त्सुनामीची सुवर्णसंधी

१५ किलर इन्स्टिंक्ट

१६. अंतिम सत्य

**हि विज्ञान**

१७. विज्ञानाचा कल्पतरू

**त्यि समीक्षा**

१८. साहित्यातील प्रीती आणि भक्ती

१९. महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती

२०. केशवसुतःवैदिक संस्कृतीचा आधुनिक उद्गाता

२१. केशवसुत गातचि बसले!

२२. वैज्ञानिक समीक्षा

**क संकीर्ण**

२३. हिंदू समाजाचा छेदाभ्यास

२४. इंग्रजीत नापास? अशक्य!!!

२५. To Be, or Not To Be

# प्रतिभेचा स्तिमित करणारा साक्षात्कार

## मुरलीधर जावडेकर यांची कला

**कथाकथन** : १५ ऑगस्ट १९९९ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेत कथासंग्रहप्रकाशन आणि कथाकथन केले. महाराष्ट्रात अनेक प्रयोग केले. श्रोते चकित, आनंदित, प्रभावित होतात. कितीही वर्षे जावोत पुनः भेटले की कथांची आठवण काढतात. आजचे आघाडीचे कथाकार.

**नाट्यवाचन** : 'मस्तानीचा बाजीराव' या स्वतःच्या नाटकाचे वाचन थोरल्या बाजीरावांच्या तीनशेव्या जन्मदिनी पुण्यात केले. त्यानंतर दूरदर्शन (सह्याद्री) ने मुलाखत घेतली आणि नाट्यवाचनाचे वर्णन 'मंत्रमुग्ध करणारे' असे करून ती प्रसृत केली. डॉ. वि. भा. देशपांडे आदींना आवडलेली संहिता आणि नाट्यवाचन.

**काव्यप्रस्तुती** : साहित्य संमेलनाध्यक्ष कविवर्य श्री. नारायण सुर्वे, गंगाधर महांबरे, संगीता जोशी इत्यादींना आवडलेल्या कविता. काव्यसंग्रहप्रकाशन आणि 'काव्याचे नाट्यपूर्ण बहारदार सादरीकरण' केले.

**एकपात्री नाट्यप्रयोग** : 'स्वातंत्र्यवीर' (वि. दा. सावरकर) हा (सावरकरांच्या ६ ध्वनिमुद्रित पदांसह) प्रयोग अत्यंत प्रभावी होतो. स्वर्गीय सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, स्वा. सावरकर संमेलनाध्यक्ष वा. ना. उत्पात आदींनी दाद दिली. प्रेक्षकांना सावरकर भेटल्याचा परमानंद होतो. पुण्याच्या 'सांस्कृतिक वार्तापत्र' संस्थेने याबद्दल सत्कार केला.

**व्याख्यान, मुलाखत इत्यादी** : धर्म, विज्ञान, संस्कृती, वाङ्मय इत्यादी विषयांवर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य प्रांतांतही अनेक व्याख्याने झाली. दूरदर्शन आणि आकाशवाणी यांनी अनेक मुलाखती घेऊन पुनः पुनः प्रसारित केल्या.

**डॉ. मुरलीधर जावडेकर**

**जन्म** : २० मे, १९३६, शिक्षण : एम.ए. (पुणे), पीएच.डी. (मुंबई)
**व्यवसाय** : मराठी, इंग्रजी प्राध्यापक, प्राचार्य.
म्हाडा उच्च उत्पन्न गट वसाहत, इमारत क्र. १,
गाळा क्र. ९, संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८
(महाराष्ट्र राज्य-भारत)
**दूरध्वनी** : ०२०-२७४२१६८३
**मोबाईल** : ९८९०१६९१५६



पुस्तक कसं वाटलं? मराठी भाषेला स्वतःची अंगभूत ग्डी आहेच. त्यात डॉ जावडेकरांचं शैलीदार लिखाण. मजा आली ना? मराठी पुस्तक वाचताना नेहमीच मजा येते. मराठी आहेच तशी.

पण काय ही आज मराठीची दूरवस्था! आज महाराष्ट्रात दोन मराठी माणसेसुद्धा एकमेकांशी मराठीत बोलत नाहीत. महाराष्ट्रात दुकानांवर मराठी बोर्ड असावेत म्हणून "खळळ खट्टाक" करावे लागते. मराठी कवी लेखकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. मराठी शाळा ओस आणि बंद पडत आहेत. पुस्तकांचं वाचन करायच्या वयात मुलं पाण्यासाठी वणवण करताहेत.

अशा वेळी मराठीचा डंका महाराष्ट्रात नव्हे, भारतात नव्हे तर जगभरात गजबजेल अशी स्वप्नं आम्ही पहातो. आमच्यासारखे अनेक लोक पहातात. २३०० वर्षांचा इतिहास असलेल्या या अमृतवाणी मराठी साहित्याचं सुवर्णयुग येईल अशी खात्री आम्ही बाळगतो. कारण मराठीत समृद्ध साहित्य आहे. कारण मराठी माणसांकडे बुद्धीमत्ता आहे. कारण मराठी माणसांकडे प्रतिभा आहे. कारण मराठी नवीन साहित्यिक आणि नवीन वाचकवर्ग उभा होताना आम्ही पहातो आहोत. बारा कोटी मराठी माणसांच्या या भाषेला अमरत्त्व आहेच आहे याची आम्हाला शंभर टक्के खात्री आहे. म्हणून आम्ही  बारा लाख मराठी लेखक वाचकांचं नेटवर्क उभं करण्यासाठी आम्ही झटत असतो. दर आठवड्याला नवनवीन ई पुस्तकं दोन लाख लोकांना विनामूल्य पाठवत असतो.

हा यज्ञ दिवसेंदिवस मोठे रूप घेतो आहे. आणि त्यात हजारो हातांचं योगदान येत आहे. नवीन लेखक पुढे येत आहेत. हजारो लोक, रोज, कुणी आठ, कुणी दहा, कुणी शंभर, मेल आय डींचं योगदान देत आहेत. तुम्हीही तुमच्या ओळखीच्या शक्य तेवढ्या मराठी लोकांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना दर आठवड्याला विनामूल्य ई पुस्तकं पाठवली जातील. मराठी माणूस भले पैशात मागे असेल, पण वाचनात इतर लोकांपेक्षा नक्की पुढे आहे. आणि आज ना उद्या ही गोगल गाय वाटणारी भाषा ढाण्या वाघाचं स्वरूप धारण करील. करीलच!

सर्वांची साथ हवी यार! कृपया आपल्या किमान आठ आप्त मित्रांच्या मेल आय डी esahity@gmail.com  या पत्त्यावर कळवा आणि या महायज्ञात सामिल करा. त्यांना आम्ही नवनवीन मराठी पुस्तकं विनामूल्य पाठवू.



**डॉ. मुरलीधर जावडेकर**

आग लागो या सगळ्याला
जेव्हा एखादा मुलगा एखाद्या मुलीवर प्रेम करण्याचा हक्क सांगत असतो तेव्हा तोच मुलगा इतर मुलींना त्याच्यावर प्रेम करण्याचा हक्क नाकारीतच नसतो काय? म्हणजेच, प्रत्येकालाचा मागण्याचा आणि नाकारण्याचा असे दोन्हीही हक्क नसतात काय? खरं तर प्रीतीच्या बाबतीत सक्ती आली की प्रीती संपलीच. प्रीती आतून आली पाहिजे. ती बाहेरून लादता येतच नाही!